पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा. ह प्रभाग मासीक सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ७

(स भा वृ त्तां त)

दिनांक – ७/०९/२०१८ वेळ. दु. १२.०० वा.

........................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ७/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहामध्ये" आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| १ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा. सुलक्षणा राजू धर | सदस्या |
| ३ | मा. शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ४ | मा. सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| ५ | मा. बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| ६ | मा. आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| ७ | मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| ८ | मा. रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| ९ | मा. राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| १० | मा. चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| ११ | मा. सोनवणे शारदा हिरेन | सदस्या |
| १२ | मा. उषा उर्फ माई मनोहर ढोरे | सदस्या |
| १३ | मा. अनिकेत राजेंद्र काटे | स्विकृत सदस्य |
| १४ | मा. कुणाल दशरथ लांडगे | स्विकृत सदस्य |
| १५ | मा. संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय घुबे (कार्य. अभियंता स्था), श्री.संजय भोसले (कार्य. अभियंता जनि), श्री.प्रदीप पुजारी (कार्य.अभियंता झोनिपू),श्री.दिलीप धुमाळ (उप.अभियंता वि), श्री.पाटील सदाशिव (उपअभियंता पा.पु), श्री.शशिकांत दवंडे (उप अभियंता पापु), श्री.काशिद एस.सी. (उप अभियंता बी.आर.टी.एस.स्था), श्री.ऐ.बी.कोंडे (उपअभियंता जनि), श्री.डी.एस.सासवडकर ( सहा. आरोग्याधिकारी ), श्री. संतोष लांडगे (उद्यान सहा.वृक्ष), श्री. जाधव शंकर (वैद्यकिय उ.अधिक्षक), श्री.आर.एस.माडे (का.अ.अतिक्रमण विभाग), श्री. जाधव अजय (मु.आ.नि.), श्री.बाराथे पी.बी. (लेखाधिकारी),

श्रीम.अंकिता मोरे (क.अ.स्था.उ.), श्री.बाळासाहेब शेटे (क.अ. बी.आर.टी.एस.स्था), श्री.गुरव शेखर ( क.अ.नगररचना), श्री.डी.डी.पवार (क.अ.पापु), श्री. खरटमोल एम.व्ही (क.अ.पापु), श्री. समीर दळवी (क.अ.वि), श्री. महेंद्र देवरे (क.अ.स्था), श्री. बनसोडे एस.पी. (क.अ.वि.), श्री. दांगडे सुनिल (क.अ.स्था), श्री. देवकर जे.डी. (क.अ.झोनिपू), श्री. सानप सचिन (क.अ.स्था), श्री. जाधव ए.एस. (क.अ.पापु), श्री.संदिप लोहकरे (क.अ.जनि), श्री.एस.बी.मानमोडे (आ.नि), इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत आला.

**अ) मागील दि. २/०८/२०१८ रोजी झालेल्या मासीक सभेचा (कार्यपत्रिका क्र.६) सभावृत्तांता मधील ठराव क्र.१४ विषय क्र.१ चे सुचक - मा.शाम लांडे व अनुमोदक - मा.स्वाती (माई) काटे यांचे नांव वगळून सदर ठराव दप्तरी दाखल करणेत येऊन सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले**

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –**

विषय क्र.१) प्रभाग क्र.३० दापोडी भिमज्योत नगर रेल्वे लाईन शेजारी व रौंदाळे वाडा नेहरु चौक या ठिकाणी मोठया प्रमाणात साठलेला **राडारोडा** उचलणेबाबत – मा.राजू बनसोडे,मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) प्रभाग क्र.३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी येथील दोन ठिकाणी विसर्जन घाटावर **कृत्रीम हौद** बांधणेबाबत - मा.रोहित काटे,मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) प्रभाग क्र.३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी येथे हिंदू तेलगू, कन्नड, लिंगायत समाजास **दफनभुमीसाठी जागा** मिळणेबाबत – मा.राजू बनसोडे,मा.स्वाती ( माई) काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४) प्र.क्र.३१ मधील पवना व मुठा नद्यामध्ये **जलपर्णी** जमा झाल्याने डासांचा त्रास दरवर्षी नागरीकांना सहन करावा लागतो यासाठी आतापासून म्हणजेच पाऊस थांबल्यावरती म.न.पा. मार्फत जलपर्णी काढणेसाठी उपाययोजना करणेबाबत - मा. सीमा चौगुले,मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) प्र.क्र.३० दापोडी येथील भिमज्योतनगर सम्राट मित्र मंडळ येथील शौचालयाचे काम बरेच वर्षापासून अपूर्ण असून काम रखडलेले आहे तरी त्या ठिकाणी गैरप्रकार व अवैध धंदे चालतात. याबाबतची नागरिकांकडून वारंवार तक्रार येत असून त्या ठिकाणी २० फुटाच्या अंतरावर पर्यायी शौचालय उपलब्ध आहे व तसेच स्वच्छ भारत योजनेअंतर्गत जवळपास सर्व नागरिकांच्या घरोघरी शौचालय बांधण्यात आले असून नागरिकांना त्या अपूर्ण अवस्थेतील शौचालयाची गरज नसून त्या ठिकाणी **समाजमंदिर बांधणेबाबत** – मा.राजू बनसोडे, मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>

----

**ठराव क्र - १८** **विषय क्र - १**

दि - ७/९/२०१८ विभाग – स्थापत्य

सुचक - मा. राजू बनसोडे अनुमोदक - मा.सुलक्षणा धर

संदर्भ - मा. राजू बनसोडे,मा. सुलक्षणा धर यांचा दि. ७ / ९ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी भिमज्योत नगर रेल्वे लाईन शेजारी व रौंदाळे वाडा नेहरु चौक या ठिकाणी मोठया प्रमाणात **राडारोडा** साठला असून त्या ठिकाणी दाट लोकवस्ती आहे. आरोग्याच्या दृष्टीने ही बाब अतिशय गंभीर असून त्या ठिकाणी पाण्याचा साठा होऊन डेंगू, चिकणगुण्या सारख्या रोगांची लागण नागरिकांना होऊ शकते. तत्पुर्वी गंभीर बाब लक्षात घेऊन लवकरात लवकर राडारोडा उचलणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

**ठराव क्र - १९** **विषय क्र - २**

दि - ७/९/२०१८ विभाग – स्थापत्य

सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा. रोहित काटे, मा.राजू बनसोडे यांचा दि. ७ / ९ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी येथील दोन ठिकाणी विसर्जन घाटावर **कृत्रिम हौद** बांधण्यात यावे. जेणेकरुन प्रभागातील मंडळाच्या व घरगुती गणेशमुर्तीचे विसर्जन त्या हौदमध्ये करण्यात येतील. त्यामुळे होणा-या जलप्रदुषणाला आळा बसेल. तसेच नदीचे सौंदर्य राखण्यात यश मिळेल. तरी प्रत्येक विसर्जन घाटावर कृत्रिम हौद बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - २०
दि - ७/९/२०१८
सुचक - मा. राजू बनसोडे
संदर्भ - मा. राजू बनसोडे,मा. स्वाती (माई) काटे यांचा दि. ७ / ९ / २०१८ चा प्रस्ताव

विषय क्र - ३
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा.स्वाती (माई) काटे

प्रभाग क्र.३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी येथे मागील ब-याच वर्षापासुन हिंदू, तेलगू,कन्नड लिंगायत समाजास दफनविधी करण्यासाठी पुणे महानगरपालिका हद्दीतील बोपोडी येथे जावे लागते तरी प्रभागातील या समाजाचे सध्याचे संख्याबळ पाहता येथे समाज मोठया प्रमाणात आहे. तरी काळाची गरज पाहता हद्दीमध्ये दफनभूमी असणे गरजेचे आहे. वरील विषयाची दखल घेत **दफनभूमीसाठी जागा** उपलब्ध करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - २१
दि - ७/९/२०१८
सुचक - मा. सीमा चौगुले
संदर्भ - मा. सीमा चौगुले व मा.माधवी राजापुरे यांचा दि. ७/९/२०१८ चा प्रस्ताव

विषय क्र - ४
विभाग – आरोग्य
अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

पवना व मुठा नद्या ह क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातून वाहतात. सदर नद्यामध्ये **जलपर्णी** जमा झाल्याने डासांचा त्रास दरवर्षी नागरीकांना सहन करावा लागतो. जलपर्णी जमा होऊ नये यासाठी आतापासून म्हणजेच पाऊस थांबल्यावरती महानगरपालिकेमार्फत जलपर्णी काढण्याचे काम त्वरीत सुरु करावे, जेणेकरुन जलपर्णी जमा होणर नाही व नागरीकांना डासांचा त्रास सहन करावा लागणार नाही. जलपर्णी काढण्याकरीता प्रचंड पैसा खर्च होतो पण जलपर्णी व त्यानंतर होणारे डास कमी होत नाही. जर पावसाळयानंतर पुढील पावसाळा येईपर्यंत नदयांची देखभाल करत राहिलात तर जलपर्णी जमा होणार नाही, तसेच नागरिकांना डासांचा त्रास सहन करावा लागणार नाही. याबाबत तातडीने उपाययोजना करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**ठराव क्र - २२**

दि - ७/९/२०१८

सुचक - मा. राजू बनसोडे

**विषय क्र - ५**

विभाग – स्थापत्य

अनुमोदक - मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. राजु बनसोडे, मा.स्वाती (माई) काटे यांचा दि. ७/९/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी येथील भिमज्योतनगर सम्राट मित्र मंडळ येथील शौचालयाचे काम बरेच वर्षापासून अपूर्ण असून काम रखडलेले आहे तरी त्या ठिकाणी गैरप्रकार व अवैध धंदे चालतात. याबाबतची नागरिकांकडून वारंवार तक्रार येत असून त्या ठिकाणी २० फुटाच्या अंतरावर पर्यायी शौचालय उपलब्ध आहे व तसेच स्वच्छ भारत योजनेअंतर्गत जवळपास सर्व नागरिकांच्या घरोघरी शौचालय बांधण्यात आले असून नागरिकांना त्या अपूर्ण अवस्थेतील शौचालयाची गरज नसून त्या ठिकाणी **समाजमंदीर** बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत )**

सभापती, ह प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे / १० / कावि / १५० / २०१८

दिनांक : २७ / ०९ / २०१८

**प्रशासन अधिकारी**

**तथा**

**सचिव (सभाशाखा)**

ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर